ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २० पुणें, बुधवार तारीख ३ मार्च, १९५४ अंक ९

## भारत सरकारचें अंदाजपत्रक

| | १९५३–५४ दुरुस्त | | १९५४–५५ अंदाज ( चालू कराप्रमाणें ) | | १९५४–५५ अंदाज (कर बदलानंतर) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कोटी | लक्ष | कोटी | लक्ष | कोटी | लक्ष |
| उत्पन्न | ४१३ | ६९ | ४४१ | ३ | ४५२ | ८८ |
| खर्च | ४३० | ६५ | ४६७ | ९ | ४६७ | ९ |
| उत्पन्न खर्चांतील तूट | १६ | ९६ | २६ | ६ | १४ | २१ |
| एकूण हिशेबी तूट | १२८ | ० | २५० | ० | २३८ | ० |

### नवा अर्थसंकल्प

नव्या वर्षांत अंदाजीं उत्पन्न ४४१·०३ कोटी रुपये व अंदाजीं खर्च ४६७·०९ होईल. म्हणजे २६·६ कोटी रुपयांची तूट अपेक्षित आहे. करांचें उत्पन्न पंधरा कोटी रुपयांनीं वाढेल. परंतु जकातींच्या उत्पन्नांत एक कोटी रुपये तूट येईल. प्राप्ती-वरील करांचें उत्पन्न मागील वर्षाइतकेंच राहील. वारसा कराच्या रूपानें चार कोटी रुपये मिळतील. परंतु त्यांतील मोठा भाग राज्यांच्या हवालीं केला जाईल. विकास–योजनांसाठी व राज्यांना मदत देण्यासाठी म्हणून यंदा वाढता खर्च करावा लागेल. चालू वर्षी ७६ कोटी, ६४ लक्ष रुपये भांडवली खर्च झाला. येत्या वर्षासाठी भांडवली खर्च म्हणून १४५ कोटी, ७५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत येणार आहे. त्याशिवाय येत्या वर्षासाठी १६० कोटी रुपये व त्यापुढील वर्षासाठी २१४ कोटी रुपये राज्य-सरकारांना कर्ज म्हणून द्यावे लागतील.

### २५० कोटींचीं ट्रेझरी बिल्स

सरकारला उत्पन्नांतील २६ कोटी रुपयांची तूट भरून काढावी लागेल. भांडवली खर्च व राज्यसरकारांना मदत देण्यासाठी ३९५ कोटी रुपये तयार ठेवावे लागतील व ५३ कोटी रुपये कर्जफेड करावी लागेल. या रकमा उभ्या करण्यासाठी सरकार ७१ कोटी रुपये लोकांकडून कर्ज मिळवील. परदेशांची मदत व डॉलर्सचें कर्ज मिळून ४८ कोटी रुपये मिळतील. छोट्या बचतयोजने-पोटीं ४५ कोटी रुपये मिळतील, इतर किरकोळ देण्याघेण्याच्या व्यवहारांत ५६ कोटी रुपये मिळतील. या सर्वांचा हिशोब केला तर एकूण तूट २५० कोटी रुपयांची येईल. ती ‘ ट्रेझरी बिल्स ’ वाढवून भागविली जाईल.

## करयोजनेंतील फेरबदल

### २६ कोटी ऐवजीं १४ कोटी रु. तूट राहणार

( १ ) सुपारीच्या आयातीवरील जकातींत साडेसहा आणे पौंड याप्रमाणें वाढ ( अपेक्षित उत्पन्न ३ कोटी रु. )

( २ ) प्लॅस्टिक, रबर इन्सुलेटेड तारा, विजेचे पंखे व इलेक्ट्रिक तारा यावरील आयात करांत वाढ ( अपेक्षित उत्पन्न १। कोटी रु. )

( ३ ) मोटारगाड्या व सुटे भाग यांच्या आयातींत ब्रिटिश मालाला देण्यांत येत असलेल्या सवलती रद्द.

( ४ ) कच्चा कापूस आणि कांहीं पोलादाच्या प्रकारावरील आयात ताबडतोब रद्द. ( अपेक्षित घट ४। कोटी रु. )

( ५ ) अति तलम कापडावरील एक्साईज करांत दर वाराला ६ पै व इतर कापडावरील दर वाराला ३ पै याप्रमाणें वाढ ( अपेक्षित उत्पन्न १·६ कोटी रु. )

( ६ ) कृत्रिम रेशमाच्या कापडावर वाराला दीड आणा या-प्रमाणें नवा कर. नवा कर हातमाग व १० पेक्षा कमी पॉवर लूम असलेले कारखाने यांच्या उत्पादनाला लागू नाहीं.

( ७ ) सिमेंटवर दर टनामागें ५ रुपये याप्रमाणें नवा कर.

( ८ ) कपड्याच्या व अंगाच्या साबणावर नवा कर. धुण्याच्या बार साबणावर हंड्रेडवेटला ५ रु. ४ आणे. धुण्याच्या इतर साबणावर ६ रु. २ आणे व अंगास लावण्याच्या साबणाला हंड्रेडवेटला १४ रु.

( ९ ) कारखान्यांत तयार केलेल्या पादत्राणावर १० टक्के कर. ( ८ व ९ मुळें अपेक्षित उत्पन्न ३॥ कोटी रु. )

## नव्या करयोजनेचा कांहीं तपशील

### चालू दरांत वाढ

| माल | चालू दर | वाढ | एकूण कर |
|---|---|---|---|
| सुपारी (पौंडास) | ९ आ. ६ पै | ६ आ. ६ पै | १ रु. |
| सुपरफाईन कापड (वारास) | २ आ. | ६ पै | २ आ. ६ पै |
| फाइन कापड (वारास) | १ आ. ३ पै | ३ पै | १ आ. ६ पै |
| इतर कापड (वारास) | ३ पै | ३ पै | ६ पै |
| कृत्रिम रेशमी कापड | — | १ आ. ६ पै | १ आ. ६ पै |

( हातमाग व खादी डेव्हलपमेंट फंडासाठी कपास कापडावर व आर्टसिल्क कापडावर बसविलेला जकात कर हा स्वतंत्र आहे, त्यांत वरीलप्रमाणें वाढ होईल. )

**रबराविषयीं कांहीं माहिती**—भारतानें १९५३ सालीं २१,१३६ टन कच्च्या रबराचें उत्पादन केलें. त्याच सालीं २१,१७५ टन कच्च्या रबराचा भारतानें वापर केला. भारतांत भरीव रबराच्या वस्तू तयार करण्याचे १३० कारखाने आणि इतर वस्तू तयार करणारे १७० कारखाने आहेत. रबराच्या उद्योगधंद्यांत एकूण सुमारें १३ कोटी रुपये भांडवल गुंतलेलें आहे आणि त्यांत १८,००० कामगारांना रोजगार मिळालेला आहे.

**हैदराबाद राज्यांतील विहिरी**—हैदराबाद राज्यांत विहिरी खणण्यासाठीं भारतीय सरकारनें ३० लाख रुपये कर्जाऊ मंजूर केले आहेत. प्रत्येक विहिरीमागें ४,५०० रुपये खर्च येतो असा अंदाज असून वरील रकमेंत १,००० विहिरी खोदण्याचें काम होणार नाहीं. इतक्या विहिरी खणण्यासाठीं आणखी १,२५,००० रुपयांची मागणी करण्यांत आली आहे.

**सिंहली भाषेंत गांधीजींचे ग्रंथ**—गांधीजींच्या दोन ग्रंथांचीं सिंहली भाषेंतील रूपांतरें सिलोनमध्यें प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत. हे दोन्हीं ग्रंथ गेल्या ३० जानेवारीला म्हणजे महात्माजींच्या ६ व्या पुण्यतिथीच्या प्रसंगीं प्रकाशित करण्यांत आले. ‘सत्याचे प्रयोग’ आणि ‘बेसिक एज्युकेशन’ हे ते दोन ग्रंथ होत. पहिल्या ग्रंथाला सीलोनचे माजी पंतप्रधान श्री. डडले सेनानायके ह्यांनीं प्रस्तावना लिहिली आहे.

**माजी राजाजवळील तिकिटांची किंमत**—इजिप्तचे माजी राजे फरूक ह्यांच्या तिकिटांच्या संग्रहाचा कैरो येथें नुकताच आंतरराष्ट्रीय लिलांव करण्यांत आला. तज्ज्ञांच्या मतानें ह्या संग्रहाची किंमत १,०२,००० पौंड असावी. प्रत्यक्ष लिलांवांत मात्र १,३८,४०० पौंड आले. १९५२ सालीं राजे फरूक ह्यांनीं राज्यत्याग केला. त्यावेळीं त्यांची सर्व मालमत्ता इजिप्तच्या सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली होती.

**मालवाहू मोटारींचें उत्पादन**—मालवाहू मोटारी आणि बसेस ह्यांचें उत्पादन करण्याचा एक कारखाना काढण्याच्या हेतूनें टाटा लोकोमोटिव्ह कंपनी आणि मर्सिडेझ बेन्झ ही जर्मन कंपनी ह्यांच्या दरम्यान वाटाघाटी चालू आहेत. कंपनीच्या भांडवलापैकीं बराच भाग जर्मन कंपनी उभारणार आहे. संकल्पित कारखान्यांत दरवर्षीं ३,००० ट्रक्स तयार करण्यांत येतील. टाटा कंपनीचे दोन डायरेक्टर करार करण्यासाठीं लवकरच जर्मनीला जाणार आहेत.

**सगळ्यांत मोठा विजेचा दिवा**—थॉमस एडिसन ह्यांनीं विजेच्या दिव्याचा शोध लावला. त्यांचा १०७ वा जन्मदिवस न्यूयॉर्क येथें नुकताच साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं जगांतील सर्वांत मोठा विजेचा दिवा लावण्यांत आला. ह्या दिव्याची उंची ३॥ फूट असून त्याची प्रकाशशक्ति ७५,००० वॅट आहे.

# कण आणि क्षण

माझे बाळपणचे मित्र व शेजारी श्री. श्रीपादराव काळे यांनीं लिहिलेलें ‘कण व क्षण’ हें पुस्तक कांहीं दिवसांपूर्वीं माझ्या हातीं आलें व मी तें मोठ्या आवडीनें वाचलें. एवढेंच नव्हे तर माझ्या ओळखीच्या कुटुंबांना तें पुस्तक वाचण्याचा आग्रह करून भंडावून सोडलें. ह्या पुस्तकांत कांहीं मोठा गहन विषय प्रतिपादन केला आहे, किंवा एखादा सुरस प्रवास वर्णिला आहे, वा मनाला चटका लावील अशी कथा सांगितलेली आहे, असें मुळींच नाहीं. ह्याउलट त्यांतील एकेका लेखाचे मथळे–उदा. ‘उपयुक्त तेंच शिक्षण घ्या’, ‘सौंदर्य नसलें तरी चालेल’, ‘पाहुणचाराचें व्यावहारिक अर्थशास्त्र’, ‘श्रीमंती आणि राहाणीचा दर्जा’, ‘मिळवत्या स्त्रीच्या अडचणी’ वगैरे–एखाद्या मासिकांत पाहून मी तो सहजासहजी वाचलाहि नसता. पण “श्रीपाद म्हणतो आहे तरी काय?” या कुतूहलानें गमतीनें पुस्तक वाचावयास घेतलें व तें मला फार आवडलें. पुस्तक आवडलें ह्याचें कारण त्यांत लाख मोलाचा उपदेश केला आहे म्हणून मात्र नव्हे. लाख मोलाचा उपदेश पुष्कळदा वडील माणसांच्या तोंडून ऐकला आहे आणि मनांत नसतांना मोठ्या मिनतवारीनें वाचला आहे. पण तो बहुतेकांप्रमाणें मलाहि अतिशय कंटाळवाणा वाटला आहे. ह्या पुस्तकांतील बहुतेक लेख मात्र उपदेशाचे वळसे असूनहि हृद्य व वाचनीय झाले आहेत. प्रत्येक लेख लहानसा व सुटसुटींत असून, एकाच लहानशा गोष्टीचा त्यांत विचार केला आहे. लेखकाची भूमिका एकंदरीनें “चुकतें कोठें” हे दाखविण्याची असली तरी कोठेंहि मोठेपणाचा किंवा शिष्टपणाचा वास लिखाणांत येत नाहीं. ज्या कौटुंबिक बाबी, व्यवहार व वर्तणूक चर्चिल्या आहेत त्यांत नुसती रूक्ष चर्चा नसून मुद्याला पोषक असे प्रसंग उदाहरणादाखल घेतलेले आहेत. हे सर्वच प्रसंग असे आहेत कीं, मध्यम स्थितींतल्या प्रत्येक माणसाला त्यांचा अनुभव आलेला असतो व त्यामुळें ते अगदीं वाचतांक्षणींच पटतात. पुष्कळ ठिकाणीं वाचणाऱ्याचें वा वाचणाऱ्याच्या ओळखीच्या माणसांचें हुबेहुब चित्रण पुढें उभें राहतें व त्यामुळें विवेचन मनाला जाऊन भिडतें. मला परत सांगायचें तें हेंच कीं, मनाला भिडतें म्हणजे हृदयस्पर्शी नव्हे. ह्या लहानशा पुस्तकांत मध्यमवर्गीयांच्या व्यवहारांतील लहानसहान रोजच्या अनुभवाला येणाऱ्या चुका अवडंबर न करतां, सोप्या भाषेंत हंसतखेळत सांगितल्या आहेत. वाचतांना मनोरंजन होतें. कारण दाखविलेल्या चुका तर पटतात, पण त्या सर्व माझ्याच आहेत ही जाणीव चट्कन् होत नाहीं. हें कौटुम्बिक चित्र बरोबर आहे हें पटतें, पण तें आपल्याच कुटुंबाचें आहे, ह्याची ओळख तावडतोब न होईल अशा खुबीनें तें रंगविलें आहे. ‘घरगुती नोकरांच्या प्रश्नाचें सत्यस्वरूप’ हा लेखच पाहा. मध्यमवर्गांतील गृहिणींच्या गृहस्थितीवर व मनोरचनेवर त्यानें विदारक प्रकाश टाकला आहे. घरगुती नोकरांच्या अडचणी जणु स्वतः अनुभवल्या अशा जिव्हाळ्यानें सांगूनहि सबंध लेखांत कोठेंहि कटुता वा कारुण्य नाहीं. लिखाण संपूर्णतया वास्तववादी असूनहि त्यांत प्रसन्नपणा आहे आणि ह्या प्रसन्नपणामुळेंच लेख कंटाळवाणे वाटत नाहींत. अगदीं बारीक दृष्टीनें मध्यमवर्गीयांचीं सर्व छिद्रें त्यांनीं दाखवून दिलीं आहेत; पण तीं आपुलकीनें, व ह्या आपुलकीच्या व जिव्हाळ्याच्या भावनेनें पुस्तकाला जिवंतपणा आला आहे. लेखक कोठेंहि आपल्या माहितीच्या जगाबाहेरच्या गोष्टी सांगत नाहीं—म्हणून प्रत्येक शब्दचित्रांत स्वानुभूति व आपल्या वर्गातील लोकांविषयीं सहानुभूति प्रगट झाली आहे. पुस्तकें वाचून माणूस आपलें वर्तन सुधारतो असें मला वाटत नाहीं. तरीहि शक्य तितक्यांनीं हें पुस्तक संग्रहीं ठेवून अधूनमधून वाचलें तर कौटुंबिक व सामाजिक जीवन सुसह्य होण्याची बरीच शक्यता आहे.

इरावती कर्वे

—सह्याद्रि, जानेवारी १९५४

# अर्थ

बुधवार, ता. ३ मार्च, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पोलादाचा नवा कारखाना रूरकेला येथेंच कां निघणार ?

भारतांत नवा पोलादाचा कारखाना काढण्यासाठीं भारतीय सरकारतर्फे कांहीं जर्मन तज्ज्ञ आले होते. त्यांनीं रूरकेला हें ओरिसामधील ठिकाण नव्या कारखान्याच्या जागेसाठीं पसंत केलें आहे. हें ठिकाण पसंत करण्यास कोणतीं कारणें झालीं तें आतां जाहीर करण्यांत आलें आहे. कारखाना नवीनच निघणार असल्यामुळें निदान सुरवातीला तरी कच्च्या मालासाठीं त्याला यशस्वी रीत्या चाललेल्या खाणींवरच अवलंबून रहाणें भाग आहे. ह्या दृष्टीनें आणि पोलादाचें वांटप करण्याच्या दृष्टीनेंहि रूरकेलाच योग्य आहे असें त्यांचें मत आहे रूरकेलाजवळ एक सिमेंटचा कारखाना आणि यांत्रिक दुरुस्ती करण्याचा एक अद्यावत् कारखानाहि आहे. भारतांत उत्तम प्रतीची लोखंडाची माती बऱ्याच प्रमाणांत सांपडते. लोखंडाच्या बहुतेक खाणी ओरिसा आणि मध्यप्रदेश ह्या राज्यांतच आहेत. कांहीं थोडया खाणी दक्षिण बिहार राज्यांतहि आहेत. लोखंडाच्या खाणीजवळच पोलादाचा कारखाना काढणें योग्य असेल तर रूरकेला आणि भिलाई हीं दोन ठिकाणें दुर्गापूरपेक्षा अधिक सोयीचीं आहेत. भारताला लागणाऱ्या लोखंडाची माती सध्यां बहुतेक सर्व सिंगभूम जिल्ह्यांतील खाणींतून पुरविण्यांत येते. मध्यप्रदेशांतील द्रुग, बैलादिला, रावघाट आणि चांदा जिल्ह्यांतून लोखंडाच्या मातीचा पुरवठा होतो. पण तो अजून लक्षांत घेण्याइतक्या मोठ्या प्रमाणावर होत नाहीं. पोलादाचा कारखाना तावडतोब काढावयाचा असल्यानें मध्यप्रदेशांतील लोखंडाच्या खाणी खर्चाच्या दृष्टीनें कारखान्याला परवडणाऱ्या होणार नाहींत आणि म्हणूनच रूरकेला हें ठिकाण भिलाई (मध्यप्रदेश) पेक्षां अधिक सोयीचें आहे.

कोकिंग कोळशाच्या पुरवठ्याच्या दृष्टीनें विचार करता दुर्गापूर (प. बंगाल) हें ठिकाण योग्य होणार नाहीं. कारण, ह्या कोळशांचा बहुतेक सांठा बोकॅरो, झरिआ आणि राणीगंज ह्या भागांतच आहे. मध्यप्रदेशांत कारखाना काढण्याचें ठरविल्यास कारखान्याला लागणाऱ्या कोळशाच्या वाहतुकीची प्रथम व्यवस्था करावी लागेल आणि ती करण्यासाठीं बराच मोठा भांडवली खर्च करावा लागेल. शिवाय दुसराहि एक महत्त्वाचा मुद्दा आहे. त्या राज्यांतील कोळशाचा शोध अजून पूर्ण झालेला नाहीं. त्यामुळें पोलाद कारखान्याच्या भट्टीला लागणारा उपयुक्त असा कोकिंग कोळसा त्या खाणींतून निघूं शकेलच अशी हमखास खात्री देतां येत नाहीं. पोलाद तयार करण्यासाठीं ह्या कोळशाचा उपयोग होऊं शकेल कीं नाहीं हें ठरविण्यास मोठ्या प्रमाणावर प्रयोग करून पाहावे लागतील असें जर्मन तज्ज्ञांचें मत आहे. सध्यांची परिस्थिति लक्षांत घेतां बोकॅरो, झरिआ व राणीगंज येथील कोळशावर अवलंबून रहाण्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं. पोलादाच्या कारखान्याला लागणाऱ्या कच्च्या मालाच्या वहातुकीच्या दृष्टीनें ह्या तज्ज्ञांनीं कारखान्यासाठीं सुचविण्यांत आलेल्या सर्व जागांचा विचार केला. इतर सर्व ठिकाणांपेक्षा रूरकेला हेंच ठिकाण वहातुकीच्या दृष्टीनें त्यांना अधिक सोयीचें वाटलें. शिवाय इमारती बांधणाच्या जागा, पाण्याचा पुरवठा व हवामान ह्याहि दृष्टीनें विचार करण्यांत आला. हिराकूद येथील धरण आणि संकल्पित पोलादाचा कारखाना जवळ जवळ एकदमच पुरे होणार आहेत. तेव्हां धरणाच्या कामावर सध्यां हंगामी म्हणून काम करीत असलेले बरेच कुशल कामगारहि कारखान्याला मिळण्यासारखे आहेत.

---

## भागदार त्याच्या बँकेस मदत कशी करूं शकतो ?

(१) बँक देत असलेल्या सर्व सोईंचा व सवलतींचा उपयोग करून बँकेनें घालून दिलेल्या व्यवहारांच्या किमान पातळीच्या खालीं न जातां, ठेवीदार किंवा कर्जदार म्हणून व्यवहार करून. "प्रत्यक्ष उदाहरणाइतकें संसर्गजन्य दुसरें कांहीं नाहीं."

(२) मित्रांना स्वतःच्या बँकेची शिफारस करून. त्यामुळें तो जुन्या मित्रांना संतोष देऊं शकेल व नवीन मित्र करूं शकेल.

(३) बचत करण्याची कोणतीहि संधि न दवडून कुटुंबांतील प्रत्येक घटकाच्या नांवानें स्वतंत्र सेव्हिंग्ज खातें उघडलें व त्यांत वक्तशीर भर टाकली जाईल अशी योजना केली, म्हणजे प्रत्येकाच्या जबाबदारीच्या जाणीवेंत भर पडते व ह्या गोष्टीचें इतरत्र अनुकरण केलें जातें.

(४) व्यवसायांतील मित्रांशीं त्यांच्या पैशाच्या अडचणींबाबत चर्चा करून, त्यांचेसाठीं बँक काय करूं शकेल, हें शोधून काढून. स्थानिक व्यवसायांची चांगली माहिती असली, म्हणजे बिनधोक व किफायतशीर कर्जे देणें बँकेस शक्य होतें.

(५) बँकेच्या गिऱ्हाइकांच्या हिताच्या वाढीस हातभार लावून. गिऱ्हाइकांची समृद्धि असली, तर बँकहि समृद्ध होते, आणि भागदारांनीं सामुदायिक प्रयत्न केले, तर एखाद्या लायक गिऱ्हाइकाच्या परिस्थितींत निश्चित सुधारणा होऊं शकते.

(६) स्थानिक आर्थिक उत्कर्षास हातभार लावून. कोणत्याहि मार्गानें समाजाचा आर्थिक उत्कर्ष झाला, म्हणजे बँकहि त्यांत सहभागी होते.

(७) बँकेच्या अधिकाऱ्यांकडून आणि डायरेक्टरांकडून बँकेच्या कारभाराच्या तत्त्वासंबंधीं माहिती करून घेऊन. ठेवीदारांचे पैसे बँक कोणत्या पद्धतीनें कर्जाऊ देते, ह्याची नीट कल्पना असली म्हणजे बँकेविरुद्ध होणाऱ्या टीकेस व पिकणाऱ्या कंड्यांस जाणतेपणानें उत्तर देतां येतें.

(८) ज्या उपक्रमांस बँकेच्या साहाय्याचा उपयोग होऊं शकेल, अशा घटनांवर लक्ष ठेवून. पुष्कळ वेळां भागदारांना कित्येक उपक्रम जाहीर होण्यापूर्वी त्यांचा पत्ता लागतो व त्याचा बँकेस उपयोग होऊं शकतो.

(९) ज्या धंद्याशीं आपला कांहीं संबंध आहे, अशांचीं खातीं बँकेकडे आणून. भागदाराच्या बँकेतर्फे शब्द टाकण्यास

कोणीच नसतो, म्हणून पुष्कळ वेळां प्रतिस्पर्धी संस्थेस फायदा मिळतो.

( १० ) ज्यांचा भागदार सभासद आहे अशा क्लब, लायब्ररया, इत्यादि संस्थांस बँकेची शिफारस करून. इतर बँकांकडे त्या संस्थांचें खातें आहे आणि स्वतःच्या बँकेकडे कां नाहीं, ह्याची चौकशी केली तर कारण सांपडेल व कांहीं भाग तरी त्याच्या बँकेकडे वळवितां येईल.

( ११ ) जिल्हाबोर्डे, म्युनिसिपालिटया, इत्यादींचीं खातीं आपल्या बँकेकडे आणण्याची खटपट करून. ह्यांत योग्य मार्गानेंच प्रयत्न केला पाहिजे.

( १२ ) भागदारांनीं एकमेकांना स्वतःजवळील माहिती सांगून. म्हणजे, कोठल्या तरी भागदाराच्या प्रयत्नास यश येईलच.

( १३ ) बँकेच्या अधिकाऱ्यांशीं वरचेवर बोलणें व चर्चा करून.

( १४ ) स्वतःच्या व्यावसायिक भेटींत बँकेच्या वतीनें बोलून व जणूं बँकेचें प्रतिनिधित्व स्वीकारून.

( १५ ) नव्या नव्या लोकांच्या ओळखी करून. त्यांपैकीं कोणीहि बँकेला मोठा धंदा मिळवून देणारा निघावयाचा !

( १६ ) बँकेची वाढ व कार्यक्षम व्यवस्था ह्यांच्या जबाबदारींत आपला वाटा आहे, असें वारंवार स्वतःस स्मरण देऊन. बँकेचा तो कांहीं अंशीं मालकच असल्यानें ही जबाबदारी दिसते त्यापेक्षा ज्यास्त खरी असते.

## सहकारी खात्यातर्फे "भिशी"ची पुनर्घटना

आपल्या राज्यांत सुसंघटित अशा सहकारी चळवळीचें अथवा अल्प बचतीच्या मोहिमेचें लोण छोट्या छोट्या उद्योगधंद्यांत गुंतलेल्या व्यापाऱ्यांपर्यंत पोहोंचण्यापूर्वी बराच काळ आधीं कित्येक समाजांत "भिशी" ही संस्था कार्य करीत होती. विशेषतः कोल्हापूर शहरांत आणि त्या शहराच्या आसपासच्या भागांत ह्या संस्थेच्या कार्याचा व्याप खूप वाढला होता; आणि पूर्वींचे कोल्हापूर संस्थान विलीन झाल्यानंतर, राज्याच्या सहकार खात्यानें या संस्थेला स्थैर्य आणून दिलें असून या खात्यातर्फे अनेक "भिशी"च्या कामकाजावर देखरेख करण्यांत येत आहे.

### कार्य करण्याची पद्धति

"भिशी" या शब्दाचा अर्थ शहरांतून एकेकट्या राहाणाऱ्या अशा लोकांनीं सामुदायिकरीत्या चालविलेली खाणावळ असा आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं लोकांनीं बचत केलेला पैसा एकत्रित करणारी संस्था असें "भिशी"चें स्वरूप आहे. तेथें चांभार, शिंपी, सुतार, न्हावी, कामगार, घरकामगार, तसेंच प्राथमिक शिक्षक आणि इतर पगारदार लोक आपल्या पगारांतून-मग तो रोजचा, आठवड्याचा, पंधरवड्याचा अगर मासिक असो-ठराविक रकमा "भिशी"मध्यें भरतात.

अशा रीतीनें "भिशी"त जमलेल्या पैशांवर व्याज मिळतें आणि सभासदांना वाजवी दरानें कर्ज मिळूं शकतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, "भिशी" हा सहकारी पतपेढीचा एक प्रकार आहे; फरक इतकाच कीं त्यांचें जें खेळतें भांडवल असतें तें संस्थेच्या प्रत्येक सभासदानें ठराविक प्रमाणांत नियमितपणें भरलेल्या पैशांतून उभे करण्यांत येतें आणि सभासदांमध्यें बचत करण्याची प्रवृत्ति वाढविणें हेंच या संस्थेचें प्रमुख कार्य आहे.

पूर्वी "भिशी" सुरू झाल्यानंतर थोड्याच वर्षांत तिचें विसर्जन करतां येत असे, आणि संस्थेची मालमत्ता सभासदांत वांटल्यानंतर त्या मालमत्तेची नासधूस होत असे. तसेंच संस्थेच्या पैशाचा व्यवहार पाहण्याची ज्यांच्यावर जबाबदारी होती त्यांनीं लबाडी केल्याचींहि कांहीं उदाहरणें आढळून आलीं होतीं.

### भिशींची मालमत्ता

तेव्हां राज्यांच्या सहकार खात्यानें "भिशी"ना मान्यता दिली आणि मुंबई सहकारी संस्थासंबंधींचा कायदा त्यांना लागू केला. तसेंच संस्थेच्या पोट-नियमांत दुरुस्ती करण्यांत आली असून निव्वळ नफ्यांतील २५ टक्के इतकी रकम राखीव निधींत टाकली पाहिजे अशी तरतूद करण्यांत आली आहे. सभासदांनीं ठेवलेल्या रकमेवर जास्तींत जास्त ४ टक्के इतकेंच व्याज देतां येईल, असें बंधन घालण्यांत आलें असून दंडादाखल व्याज वसूल करण्याची पद्धत नष्ट करण्यांत आली आहे. सभासदांनीं वेळेवर न भरलेल्या रकमांवर आकारण्यांत यावयाच्या व्याजाचा दर ६½ टक्के इतका ठरविण्यांत आला असून सभासदांच्या नांवावर भिशींत जेवढी रक्कम असेल तिच्या ८० ते ९० टक्के इतक्या रकमेपर्यंत त्या सभासदाला कर्ज देण्याची जुनीच पद्धत चालू ठेवण्यांत आली आहे. अशा रीतीनें सहकारी खात्याच्या मार्गदर्शनाखाली "भिशी"ची पुनर्घटना करण्यांत येत आहे.

एकट्या कोल्हापुरांत सध्यां ६८ "भिशी" कार्य करीत असून त्यांची सभासद संख्या ६,२५४ आहे. या "भिशी"त ३,९०,६१५ रुपये भरण्यांत आले असून त्यांचे राखीव व इतर निधी अनुक्रमें १८,३९७ रुपये आणि १०,८९१ रुपये आहेत. शिवाय त्यांचे परतफेड व्हावयाचें कर्ज ३,७४,९५९ रुपये असून खेळतें भांडवल ४,८५,६६८ रुपये आहे.

### बचत आणि सामाजिक सुरक्षितता

या संस्थेचें सभासदत्व कमी मिळकतवाल्या लोकांपुरतेंच मर्यादित आहे ही गोष्ट लक्षांत घेतां भिशींचें आर्थिक सामर्थ्य कांहीं कमी नाहीं, हें वरील आंकडेवारीवरून दिसून येतें. या संस्थेचा आणखी एक उपयोग आहे, तो म्हणजे ज्यांना त्यांच्या धंद्याच्या पडत्या काळांत किंवा आजारीपणांत अगर म्हातारपणीं आपल्या बचतीवरच अवलंबून रहावें लागतें अशा लोकांना पैशाची बचत करण्याला व खर्चांत काटकसर करण्याला या संस्थेमार्फत प्रोत्साहन मिळतें. कारण, अशा संस्थांतून त्यांनीं नियमितपणें जे पैसे वांचविले असतील ते त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना केव्हांहि मिळूं शकतात आणि जेव्हां त्यांना कर्ज मिळणें मुष्किल असतें अशा वेळीं सावकाराच्या दाराशीं जाण्याचा प्रसंगहि त्यांना टाळतां येतो.

बचत करण्याला प्रोत्साहन देणें हाच "भिशी"चा मुख्य उद्देश असल्यामुळें सहकारी संघटनांनाहि त्या पूरक ठरतात. या संस्थेच्या सभासदांना सहकारी संस्थांच्या बचतीच्या व त्यांनीं उपलब्ध करून दिलेल्या सोयींचा फायदा घेतां येतो. तसेंच संस्थेला आपली बचत दुसरीकडे गुंतविण्याची मुभा असतें हें जरी खरें असलें तरी सक्तीची बचत करण्याचें साधन असेंच "भिशी"चें स्वरूप आहे. कारण, "भिशी"च्या सभासदांना नियमितपणें ठराविक रकमा भराव्या लागतात. यामुळें सर्वसाधारणपणें जे लोक पैशाची बचत करीत नाहींत, अशा लोकांना "भिशी"मुळें बचतीची संवय लागते.

"भिशी"ची चळवळ इतर भागांत वाढविल्यास ती फायदेशीर ठरेल. शहरांतील तसेंच ग्रामीण भागांतील कमी मिळकतवाल्या लोकांना बचत करण्याच्या दृष्टीनें ती फार हितकारक ठरेल.

## बँकिंग व भांडवलपुरवठा आणि खाजगी उपक्रम

### हिंदी बँकांवरील ठेवीदारांचा विश्वास कसा वाढेल ?

शेठ प्राणलाल देवकरण नानजी ह्यांनीं वरील विषयावर को-ऑपरेटिव्ह सर्कल ( बाँबे स्टेट को. बँक लि. ) मध्यें भाषण केलें. ते म्हणाले, " पंचवार्षिक योजनेला पैसा पुरविण्याचे कामीं व्यापारी बँका कोणती कामगिरी बजावूं शकतील, असा प्रश्न नहमीं विचारला जातो. उद्योगधंद्यांना जमीन, इमारती आणि यंत्रसामुग्री ह्यांसाठी बँका मदत कां करीत नाहींत, अशीहि पृच्छा होते. त्याला माझें उत्तर असें, कीं इतर कोणाहिपेक्षा बँका कमी देशाभिमानी नाहींत. देशाच्या उद्धारासाठी शक्य तें, सर्व कांहीं करण्याची त्यांची तयारी आहे. व्यापारी बँकांना पैसा उपलब्ध करून द्या, कीं त्या लागलीच देशाच्या विकासासाठी योग्य तें करण्यास मागें राहणार नाहींत. बँका ह्या वास्तविक इतर लोकांच्या पैशाच्या राखणदार असतात. कोणत्याहि बँकेचें वसूल भांडवल व रिझर्व्हज ह्यांची बेरीज खेळत्या भांडवलाच्या ५% ते १०% असणार; उरलेले ९० ते ९५% ठेवीदारांचें असतात. ह्यांपैकीं बहुतेक रक्कम मागतां क्षणींच परत द्यावयाची असते किंवा कांहीं महिन्यांच्या मुदतीची ठेव असते.

" उद्योगधंद्यांना त्यांच्या इमारतींवर व यंत्रसामुग्रीवर कर्ज द्यावयाचें, तें दीर्घ मुदतीचें असावें लागतें. १९५२ अखेरचे आकडे पाहिले, तर शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या एकूण ८५० कोटी रु. कर्जापैकीं फक्त १८८ कोटी रुपये अशा कारणांसाठी दिलेले होते. प्लॅनिंग कमिशनच्या मतें, अशा आणखी १५० कोटी रुपयांची गरज आहे. वरील प्रमाणाप्रमाणें ही रक्कम सुमारें ५०० कोटींच्या एक तृतीयांश होते. म्हणजे, ६५० कोटींच्या नव्या ठेवी हव्यात; ही रक्कम केवढी तरी मोठी आहे ! शेड्यूल्ड बँकांना त्या मिळविणें त्यांच्या आवाक्याबाहेरचें आहे. सरकारी रोखे, पो. ऑ. नॅशनल सर्टिफिकिटें, इत्यादि प्रत्यक्ष सरकारकडेच जमा होणाऱ्या रकमांमुळें व्यापारी बँकांकडील ठेवींवर परिणाम होतो. कांहीं लहान बँका इकडे वा तिकडे बंद पडल्या, त्यामुळें बँकांवरील विश्वास कमी होऊन ठेवींत भर पडणें कठीण होतें. कांहीं बँकांनीं फार जलद गतीनें वाढ केली, पण त्यांना तें अडचणीचें झालें. ह्या सर्व प्रतिकूल परिस्थितींतहि हिंदी बँकांनीं पुष्कळच प्रगति केली आहे. तथापि, कांहीं लहान बँकांवरील आपत्तीमुळें मोठ्या आणि सुव्यवस्थित बँकांवरील विश्वासहि कमी होतो, हेंहि खोटें नाहीं. लायन्सेस देण्यांत आलेली कोणतीहि व्यापारी बँक बुडूं दिली जाणार नाहीं, ही दक्षता रिझर्व्ह बँकेनें घेतली पाहिजे. मध्यवर्ती बँकेची ती जबाबदारी आहे. लायसनदार बँकांचें आसन स्थिर करण्यासाठी रिझर्व्ह बँकेला कांहीं खर्च आला, तरी तिनें आपल्या वार्षिक मोठ्या उत्पन्नांतून त्याची तरतूद केली पाहिजे. ह्यासाठी रिझर्व्ह बँकेनें कोठल्याहि शेड्यूल्ड बँकेच्या डायरेक्टरांत किंवा व्यवस्थापकांत बदल करण्यास अथवा तिला योग्य त्या सूचना देण्यास हरकत नाहीं.

" ठेवीदारांमध्यें विश्वास उत्पन्न करण्यासाठी अमेरिकेंत चालू असलेल्या डिपॉझिट इन्शुअरन्स योजनेचें अनुकरण येथें करण्यांत यावें व १०,००० रुपयांपर्यंतच्या सर्व ठेवींचा रिझर्व्ह बँकेकरवीं विमा उतरविण्यांत यावा. विम्याचा हप्ता समजा १/१२% आला, तर त्यांतील निम्मा मध्यवर्ती बँकेनें सोसावा. अमेरिकेंत ठेवींच्या विम्याची योजना स्वावलंबी झाली आहे, एवढेंच नव्हे, तर ती


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई
शेअर भांडवल व रिझर्व रु. ११,७०,३००
ठेवी .... .... .... रु. १,१९,११,७००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,९४,५००
शाखाः- बँकेचे सर्व व्यवहार केले जातात शाखाः-
दादर
माहीम

बेळगांव
पुणें
स्थापना १९१८


नफाहि देत आहे. अगदीं चांगल्या बँकांवराहि कारण नसतां पैशाच्या एकाएकी मागणीची हुल्लड येण्याचा संभव असतो. अशी विमायोजना अंमलांत आली तर ठेवीदारांना धोका उरणार नाहीं आणि विमासंस्था किंवा रिझर्व्ह बँक अडचणींत आलेल्या बँकेस तात्काळ मदत करूं शकेल. "

---

### कल्याणकारी राज्याची कल्पना

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधील प्राध्यापक मि. टी. एच. मार्शल कांहीं दिवसांपूर्वी दिल्लीला येऊन गेले. संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या सांस्कृतिक शास्त्रीय शाखेतर्फे भरविण्यांत आलेल्या एका मेळाव्यांत भाषण करण्याकरतां ते आले होते. दिल्ली येथील स्कूल ऑफ इकॉनामिक्स ह्या संस्थेपुढें ' कल्याणकारी राज्याची कल्पना व प्रश्न ' ह्या विषयावर त्यांचें भाषण झालें. ते म्हणाले कीं, १९ व्या शतकांतील माणूस एकांतिक व्यक्तिवादामुळें अपूर्णावस्थेंतच राहिला. कल्याणकारी राज्यांत त्याचा विकास पूर्णपणें साधण्याची कल्पना ही मुख्य आहे. ब्रिटनमध्यें औद्योगिक क्रांति झाल्यानंतर सामान्य माणसास आपण पूर्णपणें निराधार झालों अशी भावना उत्पन्न झाली. त्याला व्यक्तिस्वातंत्र्य मिळालें; पण त्यामुळें त्याच्यापुढें उभे राहिलेले सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रश्न सोडविण्यास तो समर्थ ठरला नाहीं. २० व्या शतकांत कल्याणकारी राज्याची जी कल्पना उत्पन्न झाली तींत समाजांतर्गत नागरिक हक्काची बाब प्रमुख आहे. ह्या हक्काच्या जाणीवेमुळें शिक्षण, आरोग्य, योगक्षेम आणि संस्कृति ह्यांच्याबाबत संधीची समानता सांगतां येऊं लागली. पण ह्या हक्कांचें बाह्य स्वरूप आर्थिक मूल्यांत सांगण्यांत येऊं लागलें. ब्रिटनमध्यें कल्याणकारी राज्याची जी कल्पना प्रचलित आहे, तींत समाजांतील कनिष्ठ आणि वरिष्ठ वर्गांतील भेद कमी करण्याकडे लक्ष देण्यांत आलेलें आहे. तथापि ' कल्याणकारी राज्य ' हा शब्दप्रयोग तितकासा योग्य नाहीं. त्यापेक्षां कल्याणकारी समाज असा प्रयोग अधिक अन्वर्थक होईल. कारण अशा समाजांतच मनुष्याच्या ठिकाणीं पूर्वी नसलेला स्वतःबद्दलचा योग्य आदर निर्माण होऊं शकेल.

---

**बंगलोर येथें रेडिओ स्टेशन !**—बंगलोर येथें रेडिओ स्टेशन उभारण्याच्या दृष्टीनें अ. भा. रेडिआचे मुख्य एंजिनिअर श्री. रामलाल सुरी सध्यां म्हैसूर सरकारशीं वाटाघाटी करीत आहेत. भारत सरकारच्या माहिती आणि नभोवाणी खात्याच्या योजनेप्रमाणें हें स्टेशन ५० किलोवॅट शक्तीचें असेल. हें स्टेशन चालू झाल्यावर म्हैसूर येथील केंद्र बंद करण्यांत येईल.

## मुंबई राज्याचें अंदाजपत्रक

मुंबईचे अर्थमंत्री डॉ. जीवराज मेहता यांनीं कायदेमंडळांत मुंबईराज्याचें १९५४–५५ सालाचें अंदाजपत्रक सादर केलें. त्यानुसार येत्या वर्षी सुमारें १६ लाख रुपये शिल्लक पडतील असा अंदाज आहे. हें अंदाजपत्रक पुढीलप्रमाणें आहे:—

| | रुपये |
|---|---|
| उत्पन्न | ७२,३८,२१,००० |
| खर्च | ७२,२२,२३,००० |
| वाढावा | १५,९८,००० |

पुढील वर्षी करांत वाढ केली जाणार नाहीं. कर चौकशी-मंडळ मध्यवर्ति व राज्य सरकारें आणि स्थानिक संस्था यांच्या सध्यांच्या करांची चौकशी करीत असल्यामुळें या मंडळाच्या शिफारसी प्रसिद्ध होईपर्यंत सध्यांच्या करांत वाढ करणें किंवा नवे कर बसविणें इष्ट नाहीं, असें सरकारला वाटतें.

### चालू सालीं १० लाख रुपये शिल्लक

चालू सालीं प्रथमदर्शनीं १·६० कोटी रुपयांची तूट दिसत असली तरी प्रत्यक्षांत वर्षअखेरीस १० लाख रुपये शिल्लक राहतील. गेल्या वर्षी अंदाजपत्रक सादर करतेवेळीं ७·४९ लाख रुपये शिल्लक राहतील अशी अपेक्षा होती. असा फरक पडण्याचें कारण असें कीं, खर्चाच्या ज्या दोन बाबी महसूलखातीं दाखविल्या पाहिजेत त्या भांडवल, कर्जे, ठेवी व ॲडव्हान्स या विभागांत दाखविल्या आहेत. १९५३–५४ सालीं अंदाजपत्रकांत ६७,८३,५८,००० रुपये उत्पन्न धरण्यांत आलें होतें तर दुरुस्त अंदाज ७०,४६,८३,००० रुपये असा आहे. अंदाजपत्रकांतील खर्चाचा आंकडा ६७,७६,०९,००० रुपये होता तर दुरुस्त आंकडा ७२,०६,४१,००० रुपये असा आहे. जमीनमहसूल, विक्री–कर आणि मध्यवर्ती अबकारी कर व मिळकत कर यांचा राज्यसरकारला मिळालेला अधिक वाटा यांपासून जास्त उत्पन्न मिळालें. गेल्या वर्षी पाऊस चांगला पडल्यामुळें जमीनमहसुलाचें उत्पन्न अधिक आलें; तर विक्रीकराच्या बाबतींत थकबाकीची वसुली झाल्यामुळें व गुन्हेगारीविरुद्ध उपाययोजना केल्यामुळें जास्त उत्पन्न आलें. तसेंच करमणूक कर, विजेवरील कर, आणि उसावरील कर यापासूनहि थोडें अधिक उत्पन्न मिळेल. सल्फेट ऑफ अमोनियाची खरेदी व विक्री करण्यांत यावयाची असल्यामुळें शेतीच्या बाबतींतहि उत्पन्नांत व खर्चांत वाढ झाली आहे. अद्याप निमदुष्काळी परिस्थिति अस्तित्वांत असल्यामुळें पाटबंधारे, शेती व दुष्काळनिवारण या बाबींवर होणाऱ्या खर्चांत वाढ झाली आहे.

### भांडवली स्वरूपाच्या कामांसाठीं १८ कोटी रुपये

चालू सालीं भांडवली स्वरूपाच्या कामासाठीं होणारा खर्च ११·८१ कोटी रुपये असेल तर गेल्या वर्षी अंदाजपत्रकांत यासाठीं १७·८१ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. मुख्यत: निर्वासितांसाठीं असलेल्या घरबांधकामाबाबतच्या योजना, वीजयोजना आणि मोठ्या पाटबंधाऱ्यांचीं कामें यामुळें या खर्चाच्या रकमेंत ६ कोटी रुपयांनीं घट झाली. नलिका-विहिरींसाठींहि कमी खर्च आला आहे. मध्यवर्ति सरकारकडून मिळणारा पैसा, खुल्या बाजारांतील कर्जे, दुष्काळ व ऊंस, सेसफंड यांतून भांडवली खर्च भागविण्यांत येईल. स्टेटडेव्हलपमेंट फंडांतून फक्त ५० लाख रुपये काढण्यांत येतील. येत्या वर्षी भांडवली स्वरूपाच्या कामांवर १८ कोटी रुपये खर्च करण्यांत येतील. यांपैकी सुमारें ८ कोटी रु. मोठ्या पाटबंधाऱ्यांच्या व इतर पाटबंधाऱ्यांच्या योजनांसाठीं, अडीच कोटी रुपये सडकांसाठीं व इमारतींसाठीं आणि सुमारें ३॥ कोटी रुपये वीजयोजनांसाठीं खर्च करण्यांत येतील. या वीजयोजनांत कोयना–योजनेचाहि समावेश होतो. बॉम्बे स्टेट रोडट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशनच्या शेअर-भांडवलांत राज्यसरकारतर्फे भर घालण्यासाठीं एक कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

### पंचवार्षिक योजना

अनुकूल आर्थिक परिस्थिति, औद्योगिक क्षेत्रांतील शांतता आणि कायदा व सुव्यवस्था याबाबतची समाधानकारक परिस्थिति यामुळें चालू सालीं निरनिराळ्या क्षेत्रांत धीमेपणानें प्रगति व विकास झाला. सुशिक्षित वर्गांतील बेकारी कमी करण्यासाठीं चालू सालीं ४,००० आणि पुढील सालीं ६,००० प्राथमिक शिक्षकांची नेमणूक करण्यांत येईल. पंचवार्षिक योजनेंत खर्चाबाबतचे जे इष्टांक ठरवून देण्यांत आले आहेत त्याबरहुकूम राज्य सरकार पंचवार्षिक योजनेसाठीं खर्च करीत आहे. चालू सालीं पंचवार्षिक योजनेसाठीं ३१·४ कोटी रुपये खर्च करण्यांत आले असून पुढील सालीं ३२·९ कोटी रुपये खर्च करण्यांत येतील. पंचवार्षिक योजनेनुसार ठरवून दिलेला एकूण खर्चाचा इष्टांक गांठण्याच्या दृष्टीनें म्हणजे एकूण १४६·३२ कोटी रुपये खर्च करण्याच्या दृष्टीनें उरलेली ३० कोटी रुपयांची रक्कम १९५५–५६ सालीं खर्च करण्यांत येईल. निम-दुष्काळी भागांतील परिस्थिति कायमची सुधारेल अशीं कामें करण्यावर मध्यवर्ति सरकारनें विशेष भर दिला असून पंचवार्षिक योजनेच्या खर्चांत अलिकडेच जी १७५ कोटी रुपये जादा खर्चाची तरतूद करण्यांत आली आहे त्यांतून वेळोवेळीं या कार्यासाठीं मध्यवर्ति सरकार कर्जे मंजूर करीत आहे. जपानी पद्धतीची भातशेती यशस्वी झाली असून यावर्षी भाताचें उत्पादन २५ टक्के अधिक होईल.

### मुख्य मंत्र्यांच्या हवालीं ३ लक्ष रु.

या अंदाजपत्रकाचें एक वैशिष्ट्य म्हणजे या अंदाजपत्रकांत मुख्य मंत्र्यांच्या हवालीं करण्यासाठीं तीन लक्ष रुपयांची केलेली तरतूद हें होय. ज्या योजनांसाठीं अंदाजपत्रकांत तरतूद करण्यांत आली नाहीं अशा योजनांसाठीं या रकमेंतून पैसे घेतां येतील आणि कॉन्टिन्जन्सी फंडांतून कर्ज काढण्याचें आणि त्यासाठीं कायदेमंडळाची मंजुरी घेण्याचें कारण नाहीं. ही रक्कम वैद्यकीय, शेतकी शास्त्र आणि उद्योगधंदे यासंबंधीच्या योजनांसाठींच वापरतां येईल.

### लोकलबोर्डाकडे नवी जबाबदारी

जिल्हा रस्त्याशिवाय गांवांतील इतर सर्व रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठीं तीन वर्षांपुरते ते जिल्हा लोकलबोर्डाकडे देण्याबाबत राज्यसरकार उपाययोजना करीत आहे. या बाबतींत बोर्डांना ग्रँट देण्यासाठीं अंदाजपत्रकांत तरतूद करण्यांत आली आहे. तसेंच छोटे पूल, छोटीं पाटबंधाऱ्यांचीं कामें, ग्रामीण पाणीपुरवठा, शालागृहें वगैरे बांधकामासंबंधीची जबाबदारीहि लोकलबोर्डांकडे सोंपविण्याचा राज्यसरकार विचार करीत आहे.

## ब्रिटिश पुस्तकांच्या निर्यातीचा उच्चांक

१९५३ सालीं ब्रिटिश पुस्तकांची परदेशांतील विक्री इतर कोणत्याहि सालापेक्षां अधिक झाली, असें समजतें. अर्थातच विक्रीचे पैसेहि अधिक आले. १९५२ सालीं ब्रिटनमधून सुमारें १,४४,८२,०३६ पौंड किंमतीचीं पुस्तकें परदेशीं निर्यात झालीं. १९५३ सालीं सुमारें १,५७,५०,००० पौंड किंमतीचीं पुस्तकें निर्यात झालीं. पुस्तकांच्या वाढलेल्या खपाचें मुख्य कारण म्हणजे ऑस्ट्रेलियानें केलेली जादा खरेदी. ऑस्ट्रेलियानें १९५३ सालीं सुमारें ४०,००,००० पौंड किंमतीचीं पुस्तकें विकत घेतलीं. उत्तर अमेरिकेंत ब्रिटिश पुस्तकें खपलीं तर ब्रिटनला डॉलर्सची प्राप्ति होते. ह्या बाजारपेठेंत मात्र पुस्तकाच्या विक्रींत घट झाल्याचें आढळून आलें आहे. १९५२ सालीं अमेरिकेनें अंदाजें २२,२१,००० पौंड किंमतीचीं ब्रिटिश पुस्तकें आयात केलीं होतीं. १९५३ सालीं मात्र अमेरिकेनें २०,००,००० पौंड किंमतीचीं पुस्तकें विकत घेतलीं. कॅनडाच्या पुस्तकांच्या आयातींतहि अशींच घट झाल्याचें दिसून आलें आहे. १९५२ सालीं कॅनडानें ९,४०,००० पौंड किंमतीचीं ब्रिटिश पुस्तकें आयात केली. पण १९५३ सालीं मात्र अवघीं ८,५०,००० पौंड किंमतीचीं पुस्तकें ब्रिटनकडून घेतलीं. १९५३ सालीं ब्रिटननें १८,२५७ नवीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं. पुस्तकांच्या बांधणीच्या बाबतींत एक गोष्ट लक्षांत भरण्यासारखी आहे. चामड्याचें बाइंडिंग असलेलीं पुस्तकें टिकण्याच्या दृष्टीनें चांगलीं असलीं तरी त्यांच्या किंमती जास्त ठेवाव्या लागतात. म्हणून बहुतेक ब्रिटिश प्रकाशकांनीं आपल्या पुस्तकांना साधे कागदाचें बाइंडिंग करून घेतलेलें होतें. परदेशीं खपणाऱ्या ब्रिटिश पुस्तकांत कोणतीं पुस्तकें अधिक खपतात ह्यासंबंधींचे आंकडे प्रसिद्ध करण्यांत आले, तर तें उपयुक्त होईल.

## कंपनीच्या भागांची हप्तेबंदीनें खरेदी

लिमिटेड कंपन्यांचे शेअर्स हप्तेबंदीनें घेण्याची सोय अमेरिकेंत आहे. आपल्या दलालामार्फत चालू दरानें शेअर विकत घ्यावयाचा व त्याची किंमत मासिक किंवा त्रैमासिक हप्त्यांनीं भरावयाची, अशी योजना असते. दलालाकडून त्याला शेअर-सर्टिफिकेट हवें तेव्हां मिळूं शकतें. शेअरवरील डिव्हिडंड त्याचे पत्त्यावर येतें किंवा हप्त्याचे पोटीं जमा होऊं शकते. कंपनीच्या वार्षिक सभेंत मत देण्यास दलालाला सांगतां येतें. शेअर भागदाराच्या नांवानें नोंदला गेला, कीं त्याचे नांवानें कंपनीचे वार्षिक अहवाल पाठविले जातात. भागदार हप्ते भरण्याचें केव्हांहि थांबवूं शकतो किंवा शेअर विकून टाकूं शकतो. हे हप्ते दरमहा ४० डॉलर्सपासून १,००० डॉलर्स असतात. अमेरिकेंत व कांहीं प्रमाणांत हॉलंडमध्यें रूढ झालेली ही पद्धत ग्रेटब्रिटनमध्यें अद्याप अपरिचितच आहे. शेअरची किंमत कमीज्यास्त होते, डिव्हिडंड मिळतें न मिळतें, अशा परिस्थितींत लहान रकमा गुंतविणारांना हप्तेबंदीनें शेअरखरेदी आकर्षक काढणें कठीण आहे. उद्योगधंद्यांना शेअर्सच्या स्वरूपांतच भांडवल लागतें व त्यांत पैसे गुंतविणें हें थोडेसें धाडस तर कधीं कधीं साहस ठरतें. अशा परिस्थितींत, पैसे गुंतविणारांनां त्यांच्या सोईच्या हप्त्यांप्रमाणें पैसे भरून शेअर्स घेतां आले, तर औद्योगिक भांडवल-पुरवठ्यास तें पोषकच होईल.

## पुणें सें. को. बँकेच्या दौंड शाखेचा रौप्यमहोत्सव

पुणें सें. को. बँकेच्या दौंड शाखेचा रौप्यमहोत्सव दौंड येथें शनिवार दि. ६ मार्च रोजीं सायंकाळीं ५ वाजतां ज्योतिप्रसाद हायस्कूलचे जागेंत श्री. एम. पी. पाटील, सहकारी मंत्री, मुंबई राज्य, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं होणार आहे.

## म्युनिसिपल कॉर्पोरेशनना सहकारी बँकांत निधि ठेवण्यास परवानगी मिळणार

मुंबई राज्यांतील कॉर्पोरेशनना, आपला पैसा राज्य सरकार ठरवून देईल तितक्या रकमेपर्यंत आणि ज्यांना मान्यता देईल अशा सहकारी बँकांतून ठेवतां यावा म्हणून कायद्याच्या आवश्यक त्या कलमांत दुरुस्ती करण्यांत येणार आहे. याबाबतचें बिल मुंबई सरकारच्या ता. १५ फेब्रुवारीच्या गॅझेटांत प्रसिद्ध झालें आहे.

१९४९ च्या बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल म्युनिसिपल कॉर्पोरेशन्स ॲक्टाच्या ८३ व ३५२ या कलमान्वयें म्युनिसिपल फंड व ट्रान्स्पोर्ट फंड यांच्या नांवें जमा करावयाच्या सर्व रकमा इंपीरियल बँक ऑफ इंडिया किंवा दुसरी कोणतीहि शेड्यूल्ड बँक यांत भराव्या लागतात. तसेंच ९२ व ३५४ कलमान्वयें वरील दोन्ही फंडांतील जादा रकमा किंवा कर्ज निधीचे पैसे हेहि इंपीरियल बँक ऑफ इंडिया किंवा दुसरी कोणतीहि शेड्यूल्ड बँक यांत भरावे लागतात.

---

## श्री· दा· वा· पोतदार ह्यांची नेमणूक

मराठा चेंबरचे कार्याध्यक्ष श्री. दा. वा. पोतदार बी. ई., (इले.), बी. ई. (मेकॅ.), ए. एम. आय. ई, ह्यांची रिझर्व्ह बँकेच्या मुंबई लोकलबोर्डाचे सभासद म्हणून नेमणूक झाल्याचें जाहीर झालें आहे. विशेषतः सहकारी बँकिंगचा त्यांचा व्यासंग आणि अनुभव आणि त्या क्षेत्रांतील त्यांची कामगिरी ह्यास आतां व्यापक क्षेत्र मिळणार आहे. मराठा चेंबरचे कार्याध्यक्ष ह्या नात्यानें त्यांचा व्यापारी व औद्योगिक प्रश्नांशींहि जिव्हाळ्याचा संबंध आहे. श्री. पोतदार ह्यांच्या गौरवाबद्दल आम्हीं त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

---


# नोटीस

## दि बँक ऑफ कराड लिमिटेड, कराड.

बँकेच्या भागीदारांची आठवी साधारण सभा रविवार तारीख २१ मार्च १९५४ रोजीं दुपारीं ४ वाजतां कराड येथें बँकेच्या ऑफिसांत भरणार आहे. सदर वेळीं आपण अगत्य येणेचें करावें अशी विनंति आहे.

**सभेपुढील कामें:—**

१. बँकेचा तारीख ३१-१२-१९५३ अखेर संपलेल्या वर्षाचा ताळेबंद व नफातोटा पत्रक आणि डायरेक्टर बोर्डाचा रिपोर्ट यांचा विचार करणें व मंजूर करणें;

२. डिव्हिडंड मंजूर करणें;

३. निवृत्त होणाऱ्या व फेरनिवडणुकीस पात्र असलेल्या डायरेक्टरांचे जागीं तीन डायरेक्टरांची निवडणूक करणें;

४. ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें;

५. अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं कामें.

कराड, ता. ७-२-१९५४.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे हुकुमावरून,
म. वि. खंडकर,
मॅनेजर.

विशेष सूचना:—बँकेचीं शेअरट्रॅन्स्फर बुकें ता. १५ मार्च १९५४ ते २७ मार्च १९५४ पावेतों (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

**सौराष्ट्र सरकारच्या खर्चात बचत**—सौराष्ट्रांत कायदा आणि सुव्यवस्था ह्यांची नीट व्यवस्था लागल्यामुळें १९५३ सालीं १९,००,००० रुपयांची बचत होऊं शकली, असें समजतें. पोलिसांच्या संस्थेंत हळूहळू कपात करण्यांत आल्यामुळेंच मुख्यतः खर्चाची रक्कम कमी झाली आहे.

**खेळण्याच्या धंद्याला अवसर**—फोर्ड फौंडेशनतर्फे मि. अलेक्झांडर ह्या नांवाचे एक तज्ज्ञ भारतांत दौरा करीत आहेत. भारतांत छोटे उद्योगधंदे कोठें व कोणते काढतां येतील ह्यासंबंधीं ते तपास करीत आहेत. भारतांत खेळणीं तयार करण्याच्या धंद्याला अजून अवसर असल्याचें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे.

**नेपाळ सरकारच्या १ रुपयाच्या नोटा**—नेपाळ सरकारनें चालू महिन्यांत १ रुपयाच्या २५,००,००० नोटा चलन म्हणून वापरांत आणल्या आहेत. आतां नेपाळ राज्यांत एकूण ९५,००,००० एक रुपयांच्या नोटा प्रचारांत आल्या आहेत.

**कच्च्या फिल्मचा कारखाना**—भारतांत कच्च्या फिल्मचा कारखाना काढण्याचा भारत सरकार विचार करीत असून त्या संबंधीं कांहीं परदेशीय तज्ज्ञांशीं वाटाघाटीहि चालू आहेत. सध्या सर्व कच्ची फिल्म परदेशांतून आयात केली जाते. दरवर्षी सामान्यपणें २० कोटी फूट लांबीची फिल्म आयात केली जाते आणि ती साठीं १·८२ कोटी रुपये खर्च होतात.

**हिंदी मालाला जपानमध्यें मागणी**—जपानमधील अमेरिकन सैनिकांकडून भारतामधील ग्रामोद्योगांत तयार झालेल्या वस्तूंना चांगली मागणी येत आहे. अमेरिकन सेनाधिकाऱ्यांनीं टोकिओमधील हिंदी वकिलातीतर्फे अशा वस्तूंची मद्रास सरकारकडे मागणी केली आहे. खेळाचें सामान, जवाहीर, काश्मीरी शाली, चंदनाच्या कलाकुसरीच्या वस्तू, इत्यादींना मागणी आहे. वस्तूंची किंमत डॉलर्सच्या नाण्यांत देण्यास सेनाधिकारी तयार आहेत.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

— येत्या वार्षिक सभेंत भागीदारांची मंजुरी घेवून —

**शेअरवर डिव्हिडंड द्यावें असा ठराव बोर्डानें केला आहे**

**"स्पिरिट" चें उत्पादनहि लवकर सुरू व्हावयास पाहिजे**

भांडवली खर्च परत करण्यास पंचवार्षिक योजना पाहिजे
याकरितां व्याज जास्त दिलें तरी फायदाच असतो.

डिस्टिलरी सुरू करण्याकरितां मुदत पांच वर्षें व्याज साडेसात टक्के अशा पांच लक्ष रुपयांच्या ठेवी घेण्यास संचालक मंडळानें परवानगी दिली आहे.

**साखर व स्पिरिट असें जोड उत्पादन**
**म्हणजे जास्त नफा असा साधा हिशेब आहे**

## ठेवींच्या व्याजाचे दर

★ मुदत पांच वर्षें — व्याज ७॥ (साडेसात) टक्के.
★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ (सात) टक्के.
★ मुदत एक वर्ष — व्याज ६ (सहा) टक्के.

ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीपथ पुणें २.
दि. २५-२-१९५४

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंटस्.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.